"A" Re-accredited by NAAC(2014)
With CGPA-3.16

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नीत महाविद्यालये यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, फेरतपासणीची प्रक्रिया जलद होण्यासाठी संगणक कार्यप्रणालीचा उपयोग करून कामकाज करण्यात येत आहे. दंडक १०६ (B) अन्वये फेरतपासणी मध्ये विद्यार्थ्यांना मुळ गुण व फेरतपासणीचे गुण यामध्ये १० टक्के बदल झाल्यास सदर विद्यार्थ्यांना फेरतपासणीची फी परत करण्यात येते. सदरची फी वेळेत परत मिळत नसल्याबाबत कांही विद्यार्थ्यांची तक्रार असल्याने येथून पुढे सदरची फी बँक खातेवर वर्ग करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यासाठी Redressl of Grievance चा अर्ज ऑनलाईन भरत असताना विद्यार्थ्याने आपला स्वतःचा किंवा इतर जवळचे नातेवाईक यांचा बँक खाते नांव, बँक खाते क्रं. व आय.एफ.एस.सी. कोड इत्यादी माहिती भरणे **बंधनकारक (Compulsory )** असून याची जबाबदारी ही विद्यार्थ्यांची राहील अन्यथा अर्ज ऑनलाईन Submit होणार नाही.

तसेच येथून पुढे फेरतपासणी फी बाबतचा पत्रव्यवहार हा वैयक्तिक विद्यार्थ्यास करण्यात येणार नाही. तथापि फेरतपासणीची फी परत करावयांच्या विद्यार्थ्यांची यादी www.unishivaji.ac.in. या संकेतस्थळावरील Revaluation marks या वेब लिंकवर प्रसिध्द करण्यात येईल व विद्यार्थ्यांनी दिलेल्या बँक खातेवर Refund रक्कम लेखा विभागामार्फत वर्ग करण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी.

सदरचे परिपत्रक प्रत्येक सेमिस्टरला आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणावे. ही विनंती.

PSPande

उपकुलसचिव
(कॅप विभाग)

जा.क्रं.: शिवाजी वि./म.मू.के./९०६
दि. १०/०६/२०१६

प्रत :-

१) मा. परीक्षा नियंत्रक कार्यालय
२) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान परीक्षा विभाग
३) लेखा विभागास माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
४) इंटरनेट विभागास :- सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.